# ई - पोलीस पत्रिका

दि १३/०३/२०२४ अनु.क्र.४९

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली /प्रशिक्षण/रजा

## पदोन्नती

**०१. पोआअ/प्रलि-आस्था/पदावनत/२३८६/२०२४ अमरावती शहर दिनांक ०४/०३/२०२४**

### आदेश

पोहवा/1106 विनोद पिरन सोळंके नेमणुक वाहतुक शाखा (पश्चिम) अमरावती शहर यांना या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/आस्था-प्रलि/पोना ते पोहवा पदोन्नती/10538/2023 दिनांक 18.09.2023 अन्वये पोलीस हवालदार पदी पदोन्नती देण्यात आली आहे. तथापी त्यांचेविरुध्द प्रतिकुल बाबी आढळुन आल्याने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-2015/प्र.क्र.310/कार्या.12 दिनांक 15.12.2017 मधील तरतुदीनुसार त्यांना पोलीस नाईक पदावर पदावनत करण्यात येत आहे, तसेच त्यांचे प्रकरण मोहरबंद पाकीटात ठेण्यात येत आहे.

**०२. पोआअ/प्रलि-आस्था/पदावनत/२३८७/२०२४ अमरावती शहर दिनांक ०४/०३/२०२४**

### आदेश

पोहवा/1143, गोपाल शामराव रुडे नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांना या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/आस्था-प्रलि/पोना ते पोहवा पदोन्नती/10538/2023 दिनांक 18.09.2023 अन्वये पोलीस हवालदार पदी पदोन्नती देण्यात आली आहे. तथापी त्यांचेविरुध्द प्रतिकुल बाबी आढळुन आल्याने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-2015/प्र.क्र.310/कार्या.12 दिनांक 15.12.2017 मधील तरतुदीनुसार त्यांना पोलीस नाईक पदावर पदावनत करण्यात येत आहे, तसेच त्यांचे प्रकरण मोहरबंद पाकीटात ठेण्यात येत आहे.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

## शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-१/नि.का.अं.आ/पोना-६७९ निलेश जगताप/२१९४/२०२४ अमरावती शहर दि.२८/२/२०२४**

### आदेश

**संदर्भः-** १) क्र.पोआअ/विचौ/निलंबन/पोना-६७९ निलेश जगताप/२३८२/२०२३ दि.१५/०३/२०२३
२) क्र.पोआअ/विचौ-१/निलंबनमुक्त/पोना/६४९निलेशजगताप+१/७८३४/२०२३ दिनांक. ७/७/२०२३

**विषय :-** निलंबन कालावधी निश्चित करणे बाबत..

--००0--

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये पोना/६७९ निलेश मनोहरराव जगताप, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे अप.क्र. ३५९/२०२३ कलम ३५४ (ए), ३६३, ३७६ (२) (के), ५०६ भा.द.वि. चा गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. पोना/६७९ निलेश मनोहरराव जगताप, यांना या कार्यालयाचे क्रमांक. पोआअ/विचौ/निलंबन/पोना-६७९ निलेश जगताप/२३८२/२०२३ दि.१५/०३/२०२३ अन्वये निलंबीत करण्यांत येवून आदेश क्रमांक. पोआअ/विचौ-१/निलंबन मुक्त/पोना/६४९निलेशजगताप+१/७८३४/२०२३ दि.०७/०७/२०२३ अन्वये निलंबनातून मुक्त करण्यांत आले.

तरी पोना/६७९ निलेश मनोहरराव जगताप, यांचा महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयोत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील ७२ (१) (बी) नुसार पोना/६७९ निलेश मनोहरराव जगताप, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचा **दिनांक १५/०३/२०२३ पासून ते दिनांक ०७/०७/२०२३ पावेतो निलंबन कालावधी हा (As Such) "जसाचे तसा"** करण्यात येत आहे.

**२.पोआअ/विचौ-१/गै.कसुरी/अंतिम आदेश/पोना-१३०० सिसोदे/२१९६/२०२४ अम.शहर दि.२८/०२/२०२४**

## आदेश

**संदर्भ :-** क्रं. पोआअ/विचौ-१/कसुरी/कादानो/पोना-१३०० सिसोदे/४६/२०२३, दि.०२/०१/२०२४

**कसुरदाराचे नाव** :- पोना/१३०० निलेंद्र सिसोदे, नेमणूक - पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही कसूरदार पोना/१३०० निलेंद्र सिसोदे, नेमणूक पो.स्टे. गाडगेनगर, येथे नेमणूकीस असतांना तुम्ही दिनांक ०२/०३/२०२३ पासून नेमलेल्या कर्तव्यावरुन कोणतीही पूर्वसूचना न देता स्वमर्जीने गैरहजर राहील्याने तुमची विभागीय चौकशी केली असता, तुम्ही व्यसनाधिन असून दारुचे व्यसनाधिनतेमुळे वेगवेगळया आजाराला बळी पडल्याचे दिसत आहे, कर्तव्यात कामचूकारपणा करणे, पूर्णत: डयुटी न करणे, अनाधिकृतरित्या गैरहजर राहण्याच्या सवईचे असल्याबाबतचे वर्तन सिध्द झाले आहे.

तुम्ही पोलीस विभागात अत्यंत जबाबदार पदावर काम करीत असून शिस्तप्रिय पोलीस खात्याला न शोभणारे वर्तन केले आहे. तुम्हास कर्तव्याप्रती कोणतेही गांभीर्य नाही. प्रस्तूत प्रकरणी तुमची विभागीय चौकशी केली असता तुम्ही उपरोक्त प्रमाणे कसूरदार असल्याचे विभागीय चौकशीत सिध्द झाले आहे. तुमच्या अशा बेजबाबदार व बेशिस्तपणाचे व अशोभनिय वर्तनाबाबत उपरोक्त कसुरी प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (अ-२) मधील (१) चे तरतुदी नुसार **पोलीस नाईक पदावरुन ०२ वर्षाकरिता पोलीस शिपाई या पदावर पदावनत का करण्यांत येवु नये?** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक १८/०१/२०२४ रोजी स्विकारुन त्यावर दिनांक २३/०१/२०२४ अन्वये तुम्ही लेखी स्पष्टीकरण सादर केले. तत्पुर्वी तुम्हास दिनांक १६/०२/२०२४, २०/०२/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकिंत कक्षेत हजर झाले नाही (गैरहजर राहीले), तुम्ही सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक दिसून येत नसल्याने कारणे

दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेली प्रस्तावित शिक्षा कायम ठेवून खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

**अंतिम आदेश**

उपरोक्त कसुरीप्रकरणी पोना/१३०० निलेंद्र सिसोदे, नेमणूक पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील ) १९५६ नियम क्रमांक ३ (अ-२) मधील (१) चे तरतुदी नुसार **पोलीस नाईक पदावरुन ०२ वर्षाकरिता पोलीस शिपाई या पदावर पदावनत करण्यांत** येत आहे.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/प्रलि-आस्था५/अधिसंख्य पद/२३९०/२०२४अमरावती शहर दिनांक ०४/०३/२०२४**

संदर्भ :- 1.अध्यक्ष,वैद्यकीय मंडळ श्री.वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय व महाविद्यालय, यवतमाळ यांचे पत्र क्रमांक VNGMCY/M.B./899/2023 दिनांक 20.7.2023

2. या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोआअश/आस्था-5/वै.त./पोहवा-इस्त्राईल शहा/9809/ 2023, दिनांक 11.8.2023
3. या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोआअ/आस्था-5/रुग्णनिवेदन/वेतन स्थगित/1322/ 2022 दिनांक 11.2.2022
4. या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोआअ/आस्था-5/22/रुग्ण-पक्षघात/शाह/10563/ 2022, दिनांक 29.7.2022
5. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपिठ नागपुर यांचा दिनांक 24.1.2024 चा निर्णय

## आदेश

पोलीस आयुक्त,अमरावती शहर आस्थापनेवरील पोहवा/1043, इसराईल शहा रहेमान शहा नेमणुक पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर यांना पक्षघात आजार असल्याने ते दिनांक 11.12.2019 पासुन रुग्णनिवेदनावर होते. त्यामुळे त्यांना अध्यक्ष,वैद्यकीय मंडळ, श्री. वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय व महाविद्यालय, यवतमाळ येथे वैद्यकीय तपासणीकरीता पाठविण्यात आले होते. त्याअनुषंगाने त्यांची दिनांक 27.6.2023 रोजी अध्यक्ष,वैद्यकीय मंडळ, श्री. वसंतराव नाईक शासकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे वैद्यकीय तपासणी करण्यात आली असुन वैद्यकीय मंडळ यवतमाळ यांनी म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील नियम 72 प्रमाणे पुढील सेवेसाठी कायम अपात्र ठरविले असुन त्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र या

कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर पोहवा यांना अपात्रतेची माहिती अवगत केली, तसेच त्यांना अपिलची संधी देण्यात आली परंतु त्यांनी अपिल करण्यासंबंधात कार्यालयास काहीही कळविले नाही.

पोहवा/1043, इसराईल शहा रहेमान शहा यांना पक्षघात आजार झाल्याने वैद्यकीय मंडळ, यवतमाळ यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार त्यांचा रुग्णनिवेदन कालावधी या कार्यालयाचा आदेश क्रमांक पोआअ/आस्था-5/22 रुग्ण-पक्षघात/शाह/10563/2022 दिनांक 29.07.2022 अन्वये खालील प्रमाणे मंजुर करण्यात आला आहे.

| अ.क्र. | रुग्णनिवेदन कालावधी | रजा मंजुरीचा प्रकार | प्राधिकार |
|---|---|---|---|
| 1. | दि.11.12.2019 ते दि.27.2.2019 पर्यंत 79 दिवस | 79 दिवस परिवर्तीत रजा | (म.ना.से.(रजा) नियम 1981 मधील नियम 61 व नियम 79 परिशिष्ट-तीन मधील नियम 3 पोट नियम 3 प्रमाणे. |
| 2. | दि.28.2.2020 ते दि.23.12.2020 पर्यंत 300 दिवस | 300 दिवस अर्जित रजा | (म.ना.से.(रजा) नियम 1981 मधील नियम 50 व नियम 79 परिशिष्ट-तीन मधील नियम 3 पोट नियम 3 प्रमाणे. |
| 3. | दि.24.12.2020 ते दि.23.12.2021 पर्यंत 365 दिवस | 365 दिवस विशेष पक्षघात रजा | (म.ना.से.(रजा) नियम 1981 मधील नियम 79 मधील परिशिष्ट-तीन मधील नियम 3 पोट नियम 3 प्रमाणे. |
| 4. | दि.24.12.2021 ते दि.14.12.2022 पर्यंत 356 दिवस | 356 दिवस वैद्यकीय कारणास्तव असाधारण रजा (कोणत्याही प्रकारच्या रजा शिल्लक नसल्याने) | (म.ना.से.(रजा) नियम 1981 मधील नियम 63 व नियम 79 परिशिष्ट-तीन मधील नियम 3 पोट नियम 3 प्रमाणे. |

पोहवा/1043, इसराईल शहा रहेमान शहा यांचा रुग्णनिवेदन कालावधी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे मंजुर करण्यात आला असुन त्यांचे खाती कोणत्याही प्रकारच्या रजा शिल्लक नसल्याने त्यांचे वेतन बंद करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपुर येथे मुळ अर्ज क्र.943/2022 दाखल केला असुन प्रस्तुत प्रकरणी मा.न्यायालयाने त्यांच्या बाजुने निर्णय देवुन या कार्यालयाचे दिनांक 11.2.2022 चे वेतन बंद करण्याबाबतचे आदेश रद्य ठरविले आहे, तसेच अपंग व्यक्ती कायदा 1995 मधील नियम 47 व अपंग व्यक्ती कायदा 2016 मधील नियम 20 अन्वये जे कर्तव्य त्यांच्या कडुन करुन घेता येईल अशा पदावर बदली करावी, किंवा कोणतेही कर्तव्य करण्यास असमर्थ असल्यास त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंत त्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करुन त्यांना माहे फेब्रुवारी 2022 पासुन वेतन व भत्ते अदा करण्याबाबत आदेशित केले आहे.

गृहविभाग शासन परिपत्रक क्र.पीएमआर-0811/प्र.क्र.347/पोल-5 अ दिनांक 8 ऑगष्ट 2011 अन्वये शासकीय सेवेत असतांना अपंगत्व आलेल्या पोलीस अंमलदारांच्या प्रकरणी अपंग अधिनियम 1995 मधील 47 मधील तरतुदी विचारात घेवुन त्यानुसार योग्य ती कार्यवाही करणेबाबत निर्देश आहेत.

**अपंग अधिनियम 1995 हा कायदा व्यपगत करण्यात येवुन सुधारीत अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम 2016 मधील प्रकरण IV मधील नियम 20 (4) मध्ये कोणतीही शासकीय आस्थापना त्यांच्या किंवा तिच्या सेवेच्या दरम्यान अपंगत्व आलेल्या एखादया व्यक्तीला बडतर्फ करणार नाही किंवा त्याचे**

**तिचे पद कमी करणार नाही**. मात्र, अपंगत्व आल्यानंतर सांभाव्य असलेल्या पदासाठी कर्मचारी योग्य ठरत नसल्यास, त्याला दुस-या पदावर त्याच पगार व सेवा लाभासह स्थानांतरीत केले जाऊ शकते. तसेच जर त्या कर्मचा-याला दुस-या पदावर **सामावुन घेणे शक्य नसेल तर, योग्य पद मिळेपर्यंत किंवा तो सेवानिवृत्तीच्या वयाला पोचत नाही यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत त्याला अधिसंख्य पदावर ठेवता येईल असे निर्देश आहेत**.

मा.न्यायालयाने दिनांक 24.1.2024 रोजी दिलेल्या निर्णयानुसार या कार्यालयाचे 11.2.2022 चे वेतन बंद चे आदेश, तसेच दिनांक 24.12.2021 ते दिनांक 14.12.2022 पर्यंत असाधारण रजा मंजुरीचे आदेश रद्य करुन **अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम 2016 प्रकरण IV मधील नियम 20 (4)** तरतुदीनुसार पोहवा/1043, इसराईल शहा रहेमान शहा यांना दिनांक 24.12.2021 पासुन सेवानिवृत्तीच्या तारखेपर्यंत म्हणजेच दिनांक 30.9.2030 पर्यंत सेवेत संरक्षण देण्यात येत आहे. तसेच त्यांना दिनांक 24.12.2021 पासुन वेतन व भत्ते थकाबाकीसह अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस